महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४. 477 459

# प्रकटन

**विषय- मार्च २०२३ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांना सूचित करण्यात येते की, शासन निर्णय दिनांक २४/११/२०१७ नुसार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णयातील तरतुद क्र.०५ नुसार याबाबतचे प्रस्ताव विद्यार्थ्यांनी शाळेकडे दि.१५ डिसेंबर अखेर व शाळांनी विभागीय मंडळाकडे सदरचे प्रस्ताव सादर करावयाची अंतिम तारीख १५ जानेवारी अशी नमूद आहे. तथापि कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२२ चा निकाल दिनांक १६/०१/२०२३ रोजी जाहीर करण्यात येणार असल्याने शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव स्विकारण्याच्या मुदतीमध्ये वाढ करण्याबाबत विनंती केली आहे. सदर प्रस्तावास अनुसरून प्रस्ताव स्विकारण्याच्या दोन्ही तारखांना खालीलप्रमाणे मुदतवाढ या वर्षासाठीच देण्यात येत आहे.

| अ. क्र. | करावयाची कार्यवाही | शासन निर्णयानुसार अंतिम दिनांक | वाढीव मुदतीसह नवीन प्रस्तावित अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांनी शाळेकडे प्रस्ताव सादर करणे | दि.१५ डिसेंबर | सोमवार, दि.२३ जानेवारी २०२३ |
| २. | शाळांनी विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करणे | दि.१५ जानेवारी | मंगळवार, दि.३१ जानेवारी २०२३ |

तरी उपरोक्त विहीत मुदतीत सर्व विभागीय मंडळांनी योग्य ती कार्यवाही करावी. सदर मुदतवाढ आपल्या कार्यक्षेत्रील सर्व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे मुदतीत कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचित करावे. तसेच आपल्या स्तरावरुन याबाबत प्रसिध्दी देण्यात यावी व कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

(अनुराधा ओक)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-०४

दिनांक : ११/०१/२०२३

क्र.नाविमं/माध्य.ब-१/ 6021
नाशिक ४२२००३
दि.१६/०१/२०२३

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त शाळा,
नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार

उपरोक्त राज्यमंडळाच्या प्रकटनानुसार कार्यवाही करण्यात यावी तसेच कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक ४२२००३

SSC B1